# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-05.06.2026** **वार- शुक्रवार**

---

**आरबीआय रेपोदर**

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीच्या द्वैमासिक बैठकीनंतर आज या समितीनं घेतलेल्या निर्णयांची मुंबईत घोषणा करण्यात आली. सर्व प्रमुख व्याजदर जैसे थे ठेवण्याचा निर्णय समितीनं घेतला आहे. त्यामुळं रेपो दर सव्वा 5 टक्क्यांवर कायम राहणार आहे. मात्र देशाचा आर्थिक वाढीच्या दराचा अंदाज 6 पूर्णांक 9 दशांश टक्क्यांवरुन कमी करून 6 पूर्णांक 6 दशांश टक्के केला आहे. जागतिक पुरवठा साखळीत निर्माण झालेले अडथळे, यंदा पाऊस कमी होण्याचा अंदाज यामुळं आर्थिक वाढीचा दर कमी होण्याची शक्यता गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी व्यक्त केली. ग्राहक किंमत निर्देशाकांवर आधारित चलनफुगवट्याचा दर चालू आर्थिक वर्षात 5 पूर्णांक 1 दशांश टक्के राहील, असंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. यापूर्वी हा दर 4 पूर्णांक 6 दशांश टक्के असेल, असा  रिझर्व्ह बँकेचा अंदाज होता. इंधनाच्या वाढलेल्या किंमती, इतर वस्तूंच्या दरात झालेली वाढ यामुळं चलनवाढीचा दर वाढलेला असेल, असं मल्होत्रा म्हणाले.

**महाडीबीटी बियाणे वाटप**

राज्यातील शेतकऱ्यांना सुलभ आणि पारदर्शक पद्धतीनं दर्जेदार बियाणं उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागानं यंदा महत्त्वपूर्ण पाऊल उचललं आहे. खरीप हंगामासाठी आवश्यक असलेली प्रमाणित बियाणं आता महाडीबीटी पोर्टलवर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर जाऊन तात्काळ अर्ज करावेत, असे आवाहन राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलं आहे.

राज्यात यंदा खरीप हंगाम प्रमाणित बियाणे आणि प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येणार असून त्याअंतर्गत शेतकऱ्यांना विविध पिकांची गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. यामध्ये सोयाबीन, मूग, उडीद, भूईमुग, बाजरी आणि कापूस या प्रमुख पिकांचा समावेश आहे. तसंच या कार्यक्रमांतर्गत राज्यभरात तब्बल 2 लाख प्रात्यक्षिके राबविण्यात येणार असून त्याद्वारे शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञान, आधुनिक कृषी पद्धती आणि गुणवत्तापूर्ण निविष्ठांचा प्रत्यक्ष अनुभव दिला जाणार आहे.

**पर्यावरण दिन**

पुणे शहर आणि परिसरात आज विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून जागतिक पर्यावरण दिन साजरा होत आहे. अनेक संस्था- संघटनांच्या वतीनं वृक्षारोपण कार्यक्रमांच्या आयोजना सोबतच रोपांचं वाटप, व्याख्यानं अशा विविध माध्यमातून पर्यावरण रक्षणाबाबत जनजागृती करणारे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

पुणे महानगरपालिकेच्या उद्यान आणि वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत वनमहोत्सव, वृक्षारोपण, अल्प दरात रोपेवाटप तसेच बीज संकलन केंद्र उपक्रमांचे उद्घाटन छत्रपती संभाजीराजे उद्यानात करण्यात आलं.यावेळी अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण तसेच नागरिकांना रोपांचे वाटप करण्यात आलं. पुणे महानगरपालिकेच्या "हरित पुणे, समृद्ध पुणे" मोहिमेअंतर्गत वृक्षारोपण, संवर्धन आणि बीजदानाच्या माध्यमातून अधिक हरित, पर्यावरणपूरक आणि शाश्वत पुणे घडविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

पिंपरी चिंचवड शहराचं वैभव असलेल्या दुर्गादेवी टेकडी सारख्या विविध ठिकाणी पाच लाख झाडे लावून ती जगविण्याचा संकल्प आज महापालिकेने केला. यानिमित्तानं पिंपरी चिंचवड शहर अधिक हिरवंगार, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनविण्यासाठी प्रत्येक नागरिकानं या अभियानात सहभागी व्हावं, असं आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केलं. पर्यावरण दिनाचं औचित्य साधून दुर्गाटेकडीवर येथे मान्यवरांच्या हस्ते 1000 देशी रोपांची लागवड करून 'हरित पिंपरी-चिंचवड शहर' आणि 'माझी वसुंधरा' अभियानाचा उत्साहात आरंभ करण्यात आला, त्यावेळी महापौर बोलत होते. चलवादी शिक्षण संस्थेच्या वतीनं विद्यानगर इथल्या पुणे इंटरनॅशनल स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>एसटी स्वच्छता</u>**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने राज्यव्यापी अत्याधुनिक स्वच्छता मोहिमेचा आरंभ मुंबईत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला. या मोहिमेअंतर्गत राज्यभरातील प्रमुख बसस्थानकं आणि त्यांचा परिसर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अत्याधुनिक स्वच्छता उपकरणांच्या सहाय्याने नियमितपणे स्वच्छ करण्यात येणार आहे. तसेच एसटी बसेस, चालक-वाहक विश्रांतीगृहे आणि प्रसाधनगृहे यांची दर चार तासांनी स्वच्छता करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

**<u>थोपटे अंत्यसंस्कार</u>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री अनंतराव थोपटे यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी भोर इथं अंत्यसंस्कार करण्यात आले. थोपटे यांचं गुरुवारी पुण्यातील रुग्णालयात अल्पशा आजाराने निधन झालं. अनंतराव थोपटे यांनी जिल्ह्यातील भोर विधानसभा मतदारसंघाचं सहा वेळा प्रतिनिधित्व केले. सुमारे चौदा वर्षे राज्य मंत्री मंडळात कॅबिनेट मंत्री होते. तसेच ते पुण्याचे पालकमंत्री देखील राहिले होते.

**<u>पुणे हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं. शहरात कमाल तापमान 37 पूर्णांक 8 दशांश अंश तर किमान 25 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू ताज्या पुणे वृत्तांतमध्ये उद्या संध्याकाळी सहा वाजता. नमस्कार.**